**स्थायी निदेश क्र: २२**

नगरपरिषद आस्थापनेवरील
कर्मचा-यांच्या बदल्यांबाबत

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र. नप्रसई - स्थायी निदेश/२००३/प्र.क्र. ३६५ /५,
दि. २० मे, २००४

वाचा - १) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.प्रानिमं/१२९०/प्र.क्र.६९/९०/१३ अ, दि.१०.२.१९९२
२) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.प्रानिमं/१०९९/५५५/प्र.क्र.६९/९९/१३ अ, दि.११.६.१९९९

राज्यातील नगरपरिषदांमधील कर्मचा-यांचे एका नगरपरिषदेमधुन दुस-या नगरपरिषदेमध्ये किंवा इतर शासकीय/ निमशासकीय कार्यालयांमध्ये बदली करण्याबाबतचे प्रस्ताव या संचालनालयाकडे प्राप्त होत असतात. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५चे कलम ७६ नुसार संचालक नगरपरिषद प्रशासन हे नगरपरिषद आस्थापनेवर पदनिर्मित्ती करण्यास व अशा पदांच्या सेवाशर्ती व सेवाप्रवेशाचे नियम ठरविण्यास सक्षम आहे. परंतु सदर अधिनियमामध्ये नगरपरिषद कर्मचा-यांच्या बदली संदर्भात स्पष्ट तरतूद नाही. नगरपरिषदा या स्वायत्त संस्था असून प्रत्येक नगरपरिषदेला कायद्याने स्वतंत्र अस्तित्व दिले आहे. तथापी अतिशय अपवादात्मक परिस्थितीत कर्मचा-यांच्या अर्जानुसार व दोन्ही नगरपरिषदांचे ठराव विचारात घेऊन या संचालनालयाने काही बदलीच्या प्रस्तावांना यापूर्वी मान्यता दिली आहे. तरी वरील अधिनियमान्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अधिन राहुन अत्यंत अपावादात्मक परिस्थितीत नगरपरिषदांच्या कर्मचा-यांच्या बदलीच्या प्रकरणांसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दत निश्चित करण्यात येत आहे.

**प्रस्ताव कोणाकडे पाठविण्यात यावेत**

१. एका नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतून दुस-या नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत, महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत किंवा याउलट पध्दतीने कर्मचा-यांनी बदलीची मागणी केली असल्यास असे प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत. शिक्षण मंडळ ही स्वतंत्र आस्थापना असून त्यांचे कामकाज मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ अन्वये चालते. तरी अशा बदल्यांचे प्रकरणी संचालक, शिक्षण विभाग यांचे कडून मान्यता मिळणे आवश्यक आहे. असे प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविण्यात यावेत.

२. नगरपरिषदेमधून शासकीय/निमशासकीय कार्यालयात बदलीची मागणी असेल तर असे प्रस्ताव संबंधीत कार्यालयांकडे पाठविण्यात यावेत. या संचालनालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत. तसेच नगरपरिषदेमधून महानगरपालिकेमध्ये बदलीची मागणी असल्यास अशी प्रकरणे शासन नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावीत.

३. खालील ४ मध्ये नमुद केलेल्या कारणांसाठी एका नगरपरिषद आस्थापनेवरुन दुस-या नगरपरिषद आस्थापनेवर किंवा इतर शासकीय/ निमशासकीय कार्यालयांमधून नगरपरिषदेमध्ये एकतर्फी किंवा आपसात बदलीची मागणी केलेले प्रस्ताव या संचालनालयाकडे निर्णयासाठी पाठविण्यात यावेत.

**कोणते प्रस्ताव या संचालनालयाकडे पाठवावेत**

४. नगरपरिषदां या स्वायत्त संस्था असून प्रत्येक नगरपरिषदेला कायदयाने स्वतंत्र अस्तित्व दिले आहे व त्यामुळे साधारणतः एका नगरपरिषदेमधुन दुस-या नगरपरिषदेच्या आस्थापनेवर कर्मचा-यांची बदली करता येत नाही. तथापी अतिशय अपवादात्मक परिस्थितीत फक्त खालील कारणांसाठी प्रस्तावित केलेली बदलीची मागणी विशेष बाब म्हणून मान्यता देण्यासाठी संपुर्ण सेवाकालावधीत फक्त एकदाच विचारात घेण्यात येईल.

अ) पतीपत्नी एकत्रीकरणसाठी ( अ वर्ग नगरपरिषदेमधून ब किंवा क वर्ग नगरपरिषदेमध्ये)

ब) मतीमंद मुलांच्या पालकांची बदली- मतीमंद मुलांच्या (पाल्यांच्या) औषधोपचारासाठी किंवा विशेष शिक्षणासाठी विशिष्ट स्थानी बदली मिळण्याची विनंती केली असल्यास (कर्मचा-यांचा पाल्य मतीमंद असल्याचे सक्षम शासकीय वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र सादर केले असल्यास).

क) कर्मचा-याची स्वतःची, पतीची/ पत्नीची, मुलांची कायमस्वरुपी विकलांगता असल्यास व औषधोपचारासाठी विशिष्ट स्थानी बदली मिळण्याची विनंती केली असल्यास ( जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र सादर केले असल्यास).

संचालनालयाकडे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी विचारात घ्यावयाचे मुद्दे

५. बदली एकतर्फी किंवा आपसातील बदली (म्युचुअल ट्रान्सफर) अशी राहील. बदलीमध्ये समावेश असलेल्या दोन्ही नगरपरिषदांचा सर्वसाधारण सभेचा ठराव/शासकीय/निमशासकीय कार्यालयांची मान्यता असणे आवश्यक राहील.

६. बदलीची मागणी केलेल्या कर्मचा-याकडे सदर पदास आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे. सदर पदाची वेतनश्रेणी कर्मचारी सध्या घेत असलेली वेतनश्रेणीशी समतुल्य असावी. किंवा अर्जदार कमी वेतनश्रेणी असलेल्या पदावर जाण्यास तयार असावा. कोणत्याही परिस्थितीत उच्च वेतनश्रेणीमधील बदली मान्य करण्यात येणार नाही. तसेच कर्मचा-याचे खालील अ.क्र. १० च्या शर्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे शपथपत्र आवश्यक राहील.

७. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त पदावर कर्मचारी नियुक्तीसाठी प्रस्ताव जिल्हा निवड समितीकडे सादर केला असल्यास अशा रिक्त पदावर बदलीने करावयाच्या नियुक्तीस जिल्हा निवड समितीची मान्यता घेणे संबंधित नगरपरिषदेस बंधनकारक राहील.

८. बदलीसाठी अर्ज केलेल्या कर्मचा-याने /नगरपरिषदेने खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे

अ) बदलीची मागणी करणारे कर्मचारी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये मंजूरी दिलेल्या पदांवरील कर्मचारी असावेत.

ब) बदलीची मागणी केलेल्या कर्मचा-यांची मुळच्या नगरपालिकेमध्ये किमान ३ वर्षे सलगसेवा झालेली असावी.

क) या कर्मचा-यां विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसावी अथवा फौजदारी गुन्हे दाखल केलेले नसावेत.

ड) संबधित कर्मचा-याचे संदर्भात लेखापरिक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत तसेच त्यांचे नावे असलेल्या सर्व आगावु रकमांचे (Advance) समायोजन करुन घेणे त्यांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

इ) संबंधित कर्मचारी यांचेवर मुळ नगरपरिषदेच्या देय रक्कमेचे असलेल्या सर्व दायित्वातून कर्मचारी मुक्त झालेला असणे बंधनकारक राहील.

फ) बदलीच्या दिनांकाला कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा असलेली रक्कम,निवृत्तीवेतन वर्गणी व रजावेतन वर्गणी बदली झालेल्या नगरपरिषदेकडे वर्ग करावी लागेल.

९. बदली झालेल्या कर्मचा-यास स्विकारणा-या प्राधिकरणाने खालील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे

अ) एकतर्फी बदलीमध्ये ज्या नगरपालिकेमध्ये बदलून जायचे आहे त्या नगरपालिका आस्थापनेवर सदरचे पद स्थायी स्वरुपात मंजुर असुन ते रिक्त असणे आवश्यक आहे. तसेच सदरचे पद व्यपगत झालेले नसून ते भरण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची मान्यता असावी.

ब) ज्या पदांवर बदली प्रस्तावित केली आहे अशा पदांचा संवर्ग व कर्मचा-यांचा संवर्ग (अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज., वि.मा.प्र., इ.मा.प्र. व खुला) हे पडताळणे आवश्यक राहील. म्हणजेच अर्जदार रिक्त पदाच्या संवर्गाचाच असला पाहीजे.

१०. खालील मुद्यांवर कर्मचा-याचे शपथपत्र लिहून घेण्यात यावे

अ) बदली नंतरच्या कार्यालयात जेष्ठता ठरवितांना मागील सेवेचा फायदा कर्मचा-यास जेष्ठतेसाठी मिळणार नाही आणि संबधीत कर्मचारी बदलीच्या कार्यालयात तेथे अगोदरच नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना कनिष्ठ राहतील.

ब) बदलीसाठी लागणारा प्रवास खर्च संबंधीत कर्मचा-यास सहन करावा लागेल व रुजू होण्यासाठी पदग्रहणावधी मिळणार नाही. पदमुक्त झाल्यानंतर तात्काळ नविन पदावर रुजु व्हावे लागेल. (प्रत्यक्ष प्रवास कालावधी वगळून)

क) बदलीचा आदेश निर्गमित झाल्यानंतर सदर कर्मचा-यांना पूर्वीच्या (मुळच्या) नगरपरिषदेतील पदावरील धारणाधिकार संपुष्टात येईल.

ड) संबंधीत नगरपारिषदेचे सेवानियम बदलून जाणा-या कर्मचा-यास लागु होतील. या संदर्भात कोणतेही अपील कोणत्याही व्यासपीठाकडे सादर करण्याची संधी सदर कर्मचा-यास मिळणार नाही. (मु.अ./नगरपरिषद/स्थायी समिती/जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक/ संचालक नगरपरिषद प्रशासन/ शासन)

इ) सदर कर्मचा-यास शासनाने विहित केलेल्या व भविष्यात विहित केल्या जाणा-या परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

११. **प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती.**

अ) ज्या कर्मचा-यांनी बदलीची मागणी केली आहे त्यांनी वरील परिच्छेद क्र.४ प्रमाणे बदलीसाठी पात्र असल्याच्या पुराव्यासह ज्या नगरपरिषदेमध्ये कार्यरत आहे त्या नगरपरिषदेच्या मुख्याधिका-यांकडे अर्ज सादर करावा.

ब) कर्मचा-यांनी बदलीसाठी दिलेल्या कारणांची मुख्याधिका-यांनी सत्यता पडताळून कर्मचारी वरील मुद्या क्र. ८,९, व १० ची पुर्तता करीत असल्यास मुख्याधिका-यांनी सदर कर्मचा-यास ज्या नगरपरिषदेत बदलीने जावयाचे आहे त्या नगरपरिषदेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

क) ज्या नगरपरिषदेत बदली पाहिजे त्या नगरपरिषदेने संबंधित कर्मचा-याने वरील ११ ब येथे नमुद केलेला दाखला सादर केल्यानंतर वरील सर्व शर्तीचे पालन होत असल्यास अशा कर्मचा-यास बदलीने स्विकृतीसाठी तयार असलेबाबत ठराव नगरपरिषदेने पारीत करणे आवश्यक राहील.

ड) बदलीची मागणी केलेल्या कर्मचा-यास स्विकारणा-या नगरपरिषदेने ठराव केल्यानंतर मुळ नगरपरिषदेने सदर कर्मचा-यास कार्यमुक्त करण्याचा ठराव करणे आवश्यक राहील.

इ) बदलीसंबंधी वरील शर्तीचे पालन होत असल्यास असा परिपूर्ण प्रस्ताव कार्यमुक्त करणा-या नगरपरिषदेने नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे प्रस्ताव सादर करावा.

१२. **संचालकांची मान्यता**

नगरपरिषदांकडुन सादर केलेल्या प्रस्तावावर संचालक नगरपरिषद प्रशासन यांनी छाननीअंती घेतलेला निर्णय अंतिम राहिल.

१३. उपरोक्त निदेशाचे परिषदेपुढे वाचन करण्यात यावे व तशी सभा कार्यवृत्तांतात नोंद घेण्यात यावी.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति-